
दैनिक
हॅलो प्रभात दि. 23/7/2026

# दीपस्तंभाचे तत्त्वज्ञान शिक्षकांनी अंगीकारावे : डॉ. श्रुती जोशी

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

शिक्षक हा केवळ ज्ञान देणारा घटक नसून समाजाला दिशा देणारा दीपस्तंभ आहे. त्यामुळे शिक्षकांनी दीपस्तंभाचे तत्त्वज्ञान अंगीकारून विद्यार्थ्यांच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश पाडावा, असे प्रतिपादन कन्या महाविद्यालय, इचलकरंजीच्या प्रभारी प्राचार्या डॉ. श्रुती जोशी यांनी केले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त) येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष तर्फे आयोजित 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि व्यावसायिक नैतिकता' या



विषयावरील प्राध्यापक विकास कार्यक्रमात त्या प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे यांच्या हस्ते झाले. त्यांनी अशा प्रशिक्षण कार्यक्रमांमुळे नव्याने रुजू झालेल्या प्राध्यापकांना नवी ऊर्जा व दिशा मिळत असल्याचे सांगितले. डॉ.जोशी यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या कार्याचा गौरव करत शिक्षकांनी नैतिक मूल्यांचे पालन करावे, वैयक्तिक राजकीय किंवा धार्मिक विचार अध्यापनात आणू नयेत आणि राष्ट्रनिर्मितीची जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन केले.

पुढील सत्रात परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकतेवर डॉ.जी. जे.नवाथे, डॉ.डी.आर. तुपे व प्रा. एच. व्ही. चामे यांनी मार्गदर्शन केले. तर IQAC समन्वयक डॉ. एस. आर. कट्टीमनी यांनी नवीन शैक्षणिक धोरण, संशोधन, पेटंट, कॉपीराइट आणि ऑनलाइन अध्यापनातील संधींची माहिती दिली. कार्यक्रमास नवनियुक्त प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुण्य नगरी
गुरुवार, २३ जुलै २०२६

# शिक्षकांनी दीपस्तंभासारखे तत्त्वज्ञान अंगीकारावे : डॉ. जोशी

**कोल्हापूर :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विवेकानंद महाविद्यालयात (अधिकारप्रदत्त स्वायत्त) अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (आयक्यूएसी) यांच्या वतीने 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि व्यावसायिक नैतिकता' या विषयावरील एकदिवसीय प्राध्यापक विकास कार्यक्रम उत्साहात झाला. शिक्षकांनी दीपस्तंभासारखे तत्त्वज्ञान अंगीकारून विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे कार्य करावे, असे प्रतिपादन कन्या महाविद्यालय, इचलकरंजीच्या प्रभारी प्राचार्या डॉ. श्रुती जोशी यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे रचित संस्था प्रार्थना व रोपाला पाणी घालून करण्यात आली. प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांच्या हस्ते उद्घाटन झाले.